जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे. १. यांचे कार्यालय,
दिनांक :- २९ ऑक्टोबर, १९८४.

15 NOV 1984

प्रति

मा. सचिव,
दि. ट्रिनिटी स्कूल, दिघी कँप,
पुणे. ४११ ०१५.

विषय : दि ट्रिनिटी इंग्लिश स्कूल, दिघी, पुणे.
प्राथ. शाळेस परवानगी मिळणेबाबत.

Primary recogn. non aided
Permission

संदर्भ : शासनाकडील जा. क्र. विहएलएस-१०८१/५३२४३/[९१०]/
प्राशि-३, दिनांक १५. १०. १९८३ चे पत्र.

महाशय,

उपरोक्त विषयासंबंधीच्या शासनाकडील संदर्भित पत्रानुसार ख्रिश्चन सर्व्हिस सेंटर सोसायटी या संस्थेने दिघी कँप, पुणे येथे दि ट्रिनिटी इंग्लिश मिडीयम स्कूल या नावाने सुरु केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस घातलेली बंदीची अट अंशत: शिथिल करून अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या आधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१] नियमानुसार संस्था रजिस्टर असली पाहिजे.

२] संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्य काळांत कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही, अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३] संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस. एस. सी. डी. एड. ] नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४] संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५] शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे.

७] शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

८] शाळेच्या फी चे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

९] मुंबई प्राथ. शिक्षण नियमावली, १९४५ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०] नियमानुसार अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षकाचे प्रमाण भरलेच पाहिजे.

आपला विश्वासू,

मूळ प्रतीवर शिक्षण उप संचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १.

गेडाम/*

प्रत शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे. ११. यांना माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

२/- या बाबत त्यांना कळविण्यांत येते की, सदरचे शाळेची तपासणी करून, विहीत अटींची पूर्तता झाल्याची खात्री करून घेऊन अहवाल या कार्यालयास उलट टपाली पाठवावा.

-------- त्वरित.

जा.क्र.माध्य-३/९८/नमाशा/मान्यता/पुणे
शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कार्यालय,
दि. 7 AUG 1989

प्रति,

मा.सचिव,

~~के~~ दि.ट्रिनिटी फाउंडेशन, कळस

पुणे-१५.

H.S recognition

विषय :- सन. १९ ८९ या शै.वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र.एसएसएन/ १०८९/२०२०/माशि-१ दि.१५.७.८९.

महाशय,

शासनाचे संदर्भाधिन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या आपल्या शाळेत ~~मराठी~~ / इंग्रजी माध्यमातून जून १९ ८९ पासून ~~विना अनुदान~~ / कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| अ.न. | शाळेचे नांव व ठिकाण | माध्यम | इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | कळस, ता.हवेली जि.पुणे. | इंग्रजी | ८ वी ते १० वी. | कायम विना अनुदान. |

सदर संस्थानां अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

अ] या नोवन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतीरिक्त ] शासन निर्णय क्र. एसएसएन/१०८८/१६९९ /एन-माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहीत केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.च्या] फीच्या परताव्याची मागणी करता येणार नाही. अशा आशयाचे आपल्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र तयार करून या कार्यालयास पाठवावे.

तरी वर नमूद केलेल्या अटींची पुर्तता करून नवीन शाळा सुरु करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद -- पुणे -- यांचे मार्फत या कार्यालयास पाठवावा.

स्वाक्षरीत शि.उ.स. पुणे
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत

१] मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना सादर.
२] मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.
३] शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद- पुणे यांना माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांना विनंती की त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन शाळेने वर नमूद केलेल्या त्रुटी केलेल्या आहेत की, नाही याची खात्री करून द्यावी. तसेच शासनाचे संदर्भाधिन पत्रात परि.३ मध्ये नमूद केलेल्या १ ते ४ मुद्याचा अहवाल १५ दिवसांचे आत या कार्यालयास पाठवावा.